PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Gharabaher
Year: 1999

Song: Dhaav Ghe Karunakara
Lyricist: Vijay Kuvalekar

धाव घे करूणाकरा
पाव रे करूणाकरा
धाव घे करूणाकरा
पाव रे करूणाकरा
धाव घे करूणाकरा
सावळ्या प्रभू सुंदरा
धाव घे करूणाकरा
तारावया आ...
तारावया भक्तजना
तू कृपेच्या सागरा
धाव घे करूणाकरा
धाव घे करूणाकरा

ध्यानी मनी स्वप्नात तू
ध्यानी मनी स्वप्नात तू
गर्दीत तू विजनात तू
येथे तिथे सर्वत्र तू
भासात तू ध्यासात तू
भासात ध्यासात श्वासात तू
सर्वेश्वरा सर्वेश्वरा
धाव घे करूणाकरा
धाव घे करूणाकरा
सावळ्या प्रभू सुंदरा
धाव घे करूणाकरा
विश्वातला आनंद तू
हृदयातला हरी गंध तू

विश्वातला आनंद तू
हृदयातला हरी गंध तू
लावण्य तू चैतन्य तू
आ... आ... आ...
लावण्य तू चैतन्य तू
आदिम अंतिम सर्वत्र तू
विश्वेश्वरा विश्वेश्वरा
धाव घे करूणाकरा
धाव घे करूणाकरा
सावळ्या प्रभू सुंदरा
धाव घे करूणाकरा

धावती दिंड्या किती घोष घुमती
नभी पताका नाचते खेळ मांडती
खेळ मांडती घोष घुमती
खेळ मांडती
धावती दिंड्या किती घोष घुमती
नभी पताका नाचते खेळ मांडती
नामी तुझ्या रूपी तुझ्या
नामी तुझ्या रूपी तुझ्या
जन रंगती जगदिश्वरा
जगदिश्वरा जगदिश्वरा
धाव घे करूणाकरा
धाव घे करूणाकरा
सावळ्या प्रभू सुंदरा
धाव घे करूणाकरा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*